# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**4 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

## MARATHI TYPEWRITING

(40 Words Per Minute)

## SECTION - II

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना** : गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

**[गुण : ४०]**

या जगात बहुतेक प्रत्येकजण पुरेसा पैसा जवळ नाही म्हणून किंवा पुरेसा कपडालत्ता नाही म्हणून किंवा पुरेसे ग्रंथ वाचावयास मिळत नाहीत म्हणून तक्रार करीत असतो. पण पुरेसे मित्र मिळत नाहीत म्हणून दुःखी कष्टी झालेला एक तरी माणूस दिसतो का ? अमूक इतकी संपत्ती आपल्याला साठवली पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा प्रत्येक मनुष्याने मनाशी ठरवलेली असते व तेवढी संपत्ती जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत त्याचा जीव सुखी नसतो. पण असे कोणी कधी मनाशी म्हटले आहे का की मला पाच मित्र जोडलेच पाहिजेत आणि ते जो पर्यंत मला लाभत नाहीत तो पर्यंत मला हे जीवित नीरसच वाटेल. आपल्याला दोन मित्र असले काय, आणि काही प्रसंगामुळे त्या दोहोंचे दहा झाले काय आपण सारख्याच संतुष्ट वृत्तीत असतो.

मित्र वाढले त्या मानाने आयुष्याची रमणीयता वाढली असे होत नाही. दोनच मित्र असले तरी कोणी असे हळहळत नाही, की केवढे हे माझे दुर्भाग्य. परमेश्वरा, मला आणखी स्नेहयांचा लाभ होणार नाही काय ? आणि ज्याला दहा स्नेही आहेत तोही कधी मिजाशीत नसतो की दुनियेला जे लाभले नाही ते मला लाभलेले आहे.

मित्रांची संख्या फुगली काय किंवा रोडावली काय, आपले सुखदुःख असते तेवढेच रहाते. आहेत तेवढया मित्रांवर प्रत्येकजण संतुष्ट आहे. किती विचित्र आहे हे. याचे कारण असे की मित्र या शब्दातील खरे मर्म फारच थोड्या लोकांच्याच अनुभवाला आलेले असते. बहुतेक लोक खऱ्या मैत्रिच्या प्रत्ययाला मुकलेले असंतात व प्रत्ययावाचून मित्र हा शब्द ढिलेपणाने सहसा वापरत असतात. एखाद्याचा अधिक सहवास झाला की लगेच त्याला मित्र म्हणून उल्लेखतात.